# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापनि/२००७//का.८
नविन प्रश।सन भवन,मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग,मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - १४/०८/२००७

प्रति,
जिल्हाधिकारी,
औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, जालना हिंगोली,
नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया,
अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम.

विषय :- ग्रामपंचायत निवडणुका ऑक्टोबर, २००७ -- EVM द्वारे मतदान घेतांना मतदानयंत्राकरीता लागणारी खुण चिठ्ठी (Address Tag) जिल्हाधिकारी स्तरावर छापून घेण्याबाबत--- नमुना

महोदय,

यापूर्वी आपल्या कार्यालयाला कळविल्याप्रमाणे औरंगाबाद, नागपूर व अमरावती या ३ महसूली विभागातून सर्व जिल्ह्यांमध्ये ऑक्टोबर, २००७ मध्ये होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेण्यात येईल असे राज्य निवडणूक आयुक्तांचे आदेश आहेत. त्याप्रमाणे सदर मतदान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे घेण्यात येणार आहे.

या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामधील बॅलेट युनिट व कंट्रोल युनि यांचेकरीता प्रत्येकी ५ + अतिरिक्त ३ अशाप्रकारे प्रत्येक मतदान यंत्राकरीता ८ पांढरे ॲड्रेस टॅग (बॅलेट युनिटकरीता) व ८ हिरवे (कंट्रोल युनिटकरीता) ॲड्रेस टॅग आवश्यक आहेत. जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुकीच्या एकूण मतदान केंद्राच्या संख्येनुसार (+ १० % अतिरिक्त) सदर ॲड्रेस टॅग जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्तरावर छापून घेण्यात येऊन संबंधित तहसिल कार्यालयांना पुरविण्यात यावे. ॲड्रेस टॅगचा नमुना व आकारमान खाली दिल्याप्रमाणे असेल. सदर खुण चिठ्ठीस (ॲड्रेस टॅग)

बाजूला एक छिद्र असावे जे छिद्र एका धातूच्या कडीमध्ये झाकलेले असावे. जेणेकरुन त्यामधील दोरा काढल्यानंतर खुणपट्टी सहजासहजी फाटणार नाही. याबाबतची आपण करीत असलेल्या कार्यवाहीबाबत आयोगाला त्वरित अहवाल पाठविण्यात यावा.




आपला,

( मंगेश व. मोहिते )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\Gram Panchayat\Adress Tag.doc/Mahale